लोकमत

कोल्हापूर, गुरुवार, दि. २८ एप्रिल २०२२

# नेमबाजी स्पर्धेत ज्ञानेश्वरीचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मेरठमधील स्वामी विवेकानंद सुभारती विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठीय नेमबाजी स्पर्धेत कोल्हापूरच्या ज्ञानेश्वरी जयवीर पाटील हिने सहावा क्रमांक पटकाविला.



तिने या स्पर्धेत पीप साइट एअर रायफल प्रकारात ४१६.८ गुण मिळवले. या कामगिरीवर तिची बंगळुरू येथे होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला प्रशिक्षक संतोष जाधव, आंतरराष्ट्रीय नेमबाज तेजस कुसाळे, रमेश कुसाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
गुरुवार, २८ एप्रिल २०२२

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची मातोश्री वृद्धाश्रमास भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे आर. के.नगरमधील मातोश्री वृद्धाश्रमास भेट दिली. वयोवृद्धांना प्रा. सुप्रिया पाटील यांनी योग प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यानंतर विठ्ठलपंथी भजनी मंडळ राजोपाध्येनगर यांचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व डॉ. श्रुती जोशी यांनी मार्गदर्शन केले. समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. आर्या कुलकर्णी, डॉ. दादासाहेब घाडगे तसेच समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.